**'प्रेस नोट'** दिनांक:- १४/०९/२०२६

## अभिलेखावरील सराईत आरोपीस अटक करुन मोटारवाहन चोरीचे ०४ गुन्हे उघडकीस आणुन त्याचेकडुन एकूण ३,४५,०००/- रू किंमतीची एकुण ०६ मोटारवाहने हस्तगत केलेबाबत ...

---

मुलुंड पोलीस ठाणे येथे दि.२५/०८/२०२६ रोजी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गु.र.क्र १०३५/२०२६, कलम ३०३ (२) भा.न्या.सं २०२३ अन्वये उघडया जागेतुन मोटरसायकल चोरी केलेबाबत गुन्हा नोंद करण्यात आला होता. पोलीसांनी सदरचा गुन्हा दाखल करुन तपास सुरु केला होता. गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/निलेश धोंडे व पथकाने गुन्हयाचे घटनास्थळ व त्या परिसरातील सी.सी. टी.व्ही. फुटेज , तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे गुन्हयातील पाहिजे आरोपीचा मागोवा काढुन पोलीस अभिलेखावरील आरोपी नामे **संदिप नारायण वंजारी** , वय- २९ वर्षे, रा. ठी. राहूलनगर, मुलुंड कॉलनी, मुलुंड(प), मुंबई यांस अटक करुन मुलुंड पोलीस ठाणे १) गु.र.क्र. १०३५/२०२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. २) गु.र.क्र. १०५५/२०२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. ३) गु.र.क्र. १०६४/२०२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. तसेच मुंब्रा पोलीस ठाणे ४) गु.र.क्र. ९४४/२०२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. हे ०४ गुन्हे उघडकीस आणले. तसेच सदर आरोपीताकडे कौशल्यापुर्व तपास करून रुपये ३,४५,०००/- रू किंमतीची एकुण ०६ मोटारवाहने हस्तगत करण्यात आली.

अटक आरोपी नामे **संदिप नारायण वंजारी**, वय- २९ वर्षे, याचे वर मुलुंड पोलीस ठाणेस चोरी, अवैध शत्र बाळगणे, दरोडयाची पुर्वतयारी करणे असे एकुण ०७ गुन्हे यापुर्वी दाखल आहेत.

सदरची कामगिरी श्री. देवन भारती, पोलीस आयुक्त सो, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. मनोज शर्मा, पोलीस सहआयुक्त (का व सु), श्री. अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग, चेंबूर, मुंबई, श्री. अभयसिंह देशमुख, पोलीस उपआयुक्त, पुर्व परिमंडळ- ०३, मुलूंड, मुंबई, श्री. सुदर्शन होनवडजकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, मुलुंड विभाग, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मुलुंड पोलीस ठाणे, मुंबई, श्री. संतोष घाटेकर, सहा. पोलीस निरीक्षक निलेश धोंडे, पोह/संदिप आव्हाड, , पोशि/संतोष चाकणकर, पोशि/गणेश कटटे, पोशि/रमेश ढेबे, पोशि/रोहित बच्छेराव, पोशि/प्रदिप पवार यांनी सदरची कामगिरी केली आहे.

---